**मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे कार्यालय**
**जिल्हाधिकारी कार्यालय जवळ, काटा रोड, वाशिम**
**फोन क. ०७२५२- २३२३११ ई-मेल mahakowassc@aij.gov.in**

## <u>दरपत्रक सुचना</u>

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांचे अधिपत्याखाली येत असलेल्या वाशिम, मंगरुळपीर, मानोरा, मालेगांव, रिसोड, कारंजा या न्यायालयात खालीलप्रमाणे नमुद प्रतिष्ठापित संगणक व संगणक सामुग्रीचा देखभाल/दुरुस्तीचा वार्षिक करार करनेसाठी मुळ रक्कमेच्या १५ टक्के दराने **४,६४,१९५/- (अक्षरी चार लक्ष चौसष्ठ हजार एकशे पंच्यान्नव)** केंन्द्र व राज्य शासनाचे सर्व प्रकारचे (G.S.T. ect.) करांसहीत या कमाल दराचे मोहोरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे.

## District Headquarter and Subordinate Taluka Courts of Washim Judicial District
## Hardware Information and Price.

| Sr. No | Hardware/Item Description | Number of Units | Cost per Unit | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Hp Laser M202DW Printer | 11 | 8644 | 95084 |
| 2 | Two Processor Pedstel Servers (16 GB) Dell PowerEdge T440Intel Xeon Bronze 3106 | 5 | 200948 | 1004740 |
| 3 | DLES5358-Two Process Rack Mount Server (16GB) Dell PowerEdge R440Intel Xeon Rronze 3106 | 2 | 194403 | 388806 |
| 4 | Canon LBP 151dw Printer | 51 | 10934 | 557634 |
| 5 | Online UPS 2 KVA with 6 Battery 75 AH for Network Room | 6 | 50000 | 300000 |
| 6 | Online UPS 2 KVA with 6 Battery 42 AH for Network Room | 1 | 41300 | 41300 |
| 7 | Online UPS Power Gun PLGUARD 1000 | 5 | 22479 | 112395 |
| 8 | K9 Cisco ISR 4321 Router | 1 | 61509 | 61509 |
| 9 | Cisco C841M Router -4X/K9 | 5 | 18929 | 94645 |
| 10 | Digisol Media Convertor Fiber to Ethernet | 6 | 1500 | 9000 |
| 11 | Kycera Ecosys M2040dn Printer | 26 | 16520 | 429520 |
| | | | Total Hardware Amount | 3094633 |
| | | | **15% AMC Amount of Total Hardware Amount** | **464194.95** |
| | | | **Round off 15% AMC Amount of Total Hardware Amount** | **464195.00** |

## संगणक व संगणकसामुग्रीचा वार्षिक देखभाल/दुरुस्ती कराराबाबतच्या अटी व शर्ती

| | |
|---|---|
| ०१ | मोहोरबंद दरपत्रके हे वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम या नावाने दिनांक २३/११/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळुन) किंवा त्यापुर्वी या कार्यालयास पोचतील अशा बेताने सादर करावे, त्यानंतर प्राप्त झालेले दरपत्रके स्वीकारल्या जाणार नाहीत. |
| ०२ | सदरहु दरपत्रक सुचनेतील नमुद संगणक यंत्रसामुग्री कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपुर्णतः वगळण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांनी राखुन ठेवले आहेत. |
| ०३ | कोणतीही एक अथवा सर्व दरपत्रके कारण न देता नकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांनी स्वतःकडे राखुन ठेवला आहे. |
| ०४ | संगणक यंत्रसामुग्री वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार वाशिम, मंगरुळपीर, मालेगांव, मानोरा, रिसोड, कारंजा येथील न्यायालयात प्रतिष्ठापित केलेल्या संगणक व संगणक यंत्रसामुग्री करीता राहील. |
| ०५ | करार झाल्यावर व्यवसायीकाला/सेवापुरवठादाराला यंत्रसामुग्री दुरुस्ती बाबत तकार दिली असता वाशिम जिल्हा मुख्यालयस्थित सदरहु तकार २४ तासाचे आत हजर राहुन दुरुस्ती करुन दयावी लागेल व तालुक्याचा ठिकाणी ७२ तासाचे आत स्वखर्चाने उपस्थित राहुन दुरुस्ती करुन दयावी लागेल तसेच कोणत्याही ठिकाणी सर्व्हरमध्ये दुरुस्ती असल्यास त्वरीत हजर राहुन ती निवारण करावी लागेल. |
| ०६ | मुख्यालयी असलेल्या अभियंत्यास दुरध्वनीद्वारे संगणक यंत्रसामुग्री दुरुस्ती संदर्भात तकार दिल्यास त्यांना त्यांची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल. |
| ०७ | संगणक यंत्रसामुग्री दुरुस्ती मध्ये सुटे भाग दुरुस्ती करीता नेल्यास दोन दिवसाचे आंत सदरहु सुटे भाग दुरुस्त करुन जोडणी करुन दयावी लागेल व दुरुस्तीला विलंब लागत असल्यास त्या ठिकाणी पर्यायी संगणक व संगणकसामुग्री उपलब्ध करुन दयावी लागेल. |
| ०८ | वरील नमुद न्यायालयातील संगणक यंत्रसामुग्री मध्ये Linux/Ubuntu Operating System /Case Information System वापरण्यात येते याची नोंद घ्यावी. |
| ०९ | दरपत्रक मंजुर झाल्यावर संबंधीतास १००/- रुपयाचे बॉन्डपेपरवर आपला करार करुन दयावा लागेल व सदरहु १००/- रुपयाचे बॉन्डपेपरचा खर्च संबंधीतास सोसावा लागेल. सदरचा करार हा कराराचे दिनांकापासुन एका वर्षाचा राहील. |
| १० | वार्षिक देखभाल/दुरुस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर जसे की, (G.S.T, Income Tax, etc. ) दरपत्रक मंजुर झालेल्या संबंधीतास व्यवसायीकाला/सेवापुरवठादाराला सोसावे लागतील या कार्यालयाकडुन सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधीतास अदा करण्यात येणार नाहीत. |
| ११ | संगणक व संगणकसामुग्री चे उपकरणांची व्यापक/सर्वसमावेशक (Comprehensive) देखभाल/दुरुस्ती करार असल्यामुळे त्यांचे विविध सुटे पार्ट दुरुस्त करने व दुरुस्त न झाल्यास बदलुन देणे करारामध्ये समाविष्ठ राहतील त्याबाबतचे वेगळे देयक अदा केले जाणार नाही. |
| १२ | देयक हे त्रैमासिक पध्दतीने सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १३ | देयक हे द्विप्रतीत संपुर्ण तपशीलासह या कार्यालयाला सादर करावे लागेल. |
| १४ | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळुन देयक अदा करण्यात येईल. |
| १५ | दरपत्रक हे केंन्द्र व राज्य शासनाचे सर्व प्रकारचे (G.S.T) करांसहीत **४,६४,१९७/- (अक्षरी चार लक्ष चौसष्ठ हजार एकशे पंच्यान्नव)** या कमाल दराचे बोलाविण्यात येत आहे. |
| १६ | यु.पी.एस बॅटरी व प्रिंटरच्या टोनर व कार्टेजची रीफिलींग करारामध्ये समाविष्ठ राहणार नाही. |
| १७ | दरपत्रक मंजुर झाल्यास आणि करार झाल्यावर काही कारणास्तव संबंधितास करारानुसार सेवा दयावयाची नसल्यास त्यासंबंधी दोन महीना आगोदर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना लेखी स्वरुपात कळवावे लागेल व तसे न केल्यास सेवा दिलेल्या कालावधीपैकी शेवटचे दोन महीन्याचे देयक मागण्याच्या अधिकार संबंधीतास राहणार नाही. |
| १८ | सदर संगणक व संगणकसामुग्रीचा करार होण्याच्या अगोदर कोणत्याही टप्प्यावर दरपत्रक रदद् करणे/बदल करण्याचा अधिकार हा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वाशिम यांना राहील. |
| १९ | करारानुसार काम न केल्यास किंवा अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार संपुर्णतः रदद् करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वाशिम यांना राहतील. |

THE COURT OF PRINCIPAL DISTRICT JUDGE & SESSIONS JUDGE ★ WASHIM ★

सत्यमेव जयते

**दिनांक : १३/११/२०२४**

13/11/24

**( एस. व्ही. हांडे )**
प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश,
वाशिम